# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ४०२-२२ दिनांक ३१/१२/२०२२

## वर्ष २०२२ मध्ये बालकांच्या अपहरणाचे एकुण १०६ गुन्हे उघड करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा यांना यश.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभागामार्फत अपहरीत बालकांच्या संबंधाने दाखल होणा-या गुन्हयांचा संमातर तपास करित असतांना सन २०२२ मध्ये सदर कक्षाकडून मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिमंडळातील २ व ३ मधील पोलीस ठाण्यात अपहरीत बालकांबाबत दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली संमातर तपास करण्यात आला. लहान बालकांच्या अपहरणाचे गुन्हे दाखल होताच अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत कार्यवाही करुन तांत्रीक माहिती व इतर माहितीच्या आधारे एकुण १०६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यात ३८ मुले व ७४ मुली अशा एकुण ११२ बालकांचा शोध घेवुन त्यांना संबंधीत तपासी अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करुन त्यांच्या मार्फत पालकांच्या ताब्यात देण्यात यश आलेले आहे.

तसेच सन २०२२ मध्ये अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कायदा १९५६ अन्वये अवैध वेश्याव्यवसाय संबंधाने एकुण १८ कारवाई केल्या असुन २३ आरोपीतांवर कारवाई करुन एकुण २३ महिला व ०७ अल्पवयीन मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केलेली आहे. अंमली पदार्थ कायदयाअंतर्गत ०२ केसेस, बाल कामगार कायदयांअतर्गत ०७ केसेस करुन ११ आरोपीतांवर कारवाई करुन एकुण १७ बालकांची सुटका करण्यात आलेली आहे. तसेच एकुण ०४ बोगस डॉक्टरांवर कारवाई करुन इतर अवैध्य धंदयावर एकुण ०३ कारवाया करुन आरोपीतांवर सदर कक्षाकडुन गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदर कारवाई श्री. अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्षाचे पोलीस निरीक्षक/संतोष सोपान चौधरी असुन पोउपनिरी/प्रकाश निकम, पोहवा/बापु पवार, पोहवा/राजेश पद्मने, पोहवा/महेंद्र शेट्टे, पोहवा/रोशन किणी, पोहवा/श्याम शिंदे,पोहवा/सुनिल पागी, मपोहवा/साक्षी डोईफोडे, मपोहवा/सुप्रिया तिवले, मपोशि/पाटील, मपोशि/जगदाळे यांनी केलेली आहे.

--------------oo---------------